# अमृतवाहिनीतील मेधा महोत्सवात 32 महाविद्यालयाचे धमाकेदार सादरीकरण

## *16 जिल्ह्यांमधील 530 विद्यार्थ्यांचा सहभाग  मेधा महोत्सव उत्तर महाराष्ट्राचा सांस्कृतिक मानबिंदू*

**अमृतवाहिनी शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित मेधा महोत्सवात राज्यभरातील 16 जिल्ह्यांमधील 32 महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध धमाकेदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग आणि दर्जेदार झालेले कार्यक्रम यामुळे हा मेधा महोत्सव संस्मरणीय ठरला.**

**यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सौ. कांचनताई थोरात, संस्थेच्या विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, यांच्यासह सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व विभाग प्रमुख, पालक व शिक्षक उपस्थित होते.**

**अमृतवाहिनी मेधा कप मध्ये, अहमदनगर ,नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार ,पुणे, छत्रपती संभाजीनगर, जालना, सांगली, सातारा, कोल्हापूर, रायगड ठाणे यांसह 16 जिल्ह्यातील  विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.**

**अमृतवाहिनी बी फार्मसी महाविद्यालयाने मेधा कप जिंकून प्रथम क्रमांकाचे 51 हजार रुपये बक्षीस व सन्मानचिन्ह पटकावले तर द्वितीय क्रमांक समर्थ महाविद्यालय बेल्हे यांनी मिळवले 31 हजार रुपये, सन्मानचिन्ह तर पंडित नेहरू विद्यालय जुन्नर यांनी तृतीय क्रमांकाचे 21 हजार रु.,सन्मानचिन्ह पटकावले. याप्रसंगी संस्थेतील 10 हजार विद्यार्थी उपस्थित होते. ऑनलाइन पद्धतीने 83912 नागरिकांनी हा कार्यक्रम पाहिला....**




















MEDHA
2025
An AMRUTVAHINI CULTURAL FEST


AMRUTVAHINI
Since 1978
MEDHA
2025
An AMRUTVAHINI CULTURAL FEST



